RNI NO. MAHMAR/25/A3029

लातूर

वर्ष : ७ वे, अंक नं. : ४२

दि. ०३ जून २०२६, वार : बुधवार

पाने : ४, किंमत : स्वागत मूल्य २ रू.

दैनिक महावृत्त

E-mail : dainikmhavratt@gmail.com

संपादक : अशोक हनवते, मो. 9421094991, 7264079990

# राज्यातील शेतकरी कर्जमाफीचा निर्णय अंतिम टप्प्यात; आचारसंहितेमुळे घोषणेला ब्रेक- मुख्यमंत्री फडणवीस

**मुंबई/प्रतिनिधी :** राज्यातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची असलेली कर्जमाफी योजना अंतिम टप्प्यात पोहोचली असून तिची संपूर्ण प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यास निवडणूक आयोगानं परवानगी दिली आहे. मात्र, या निर्णयाची सार्वजनिक घोषणा करण्यास आयोगानं सध्या मनाई केली असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली.

मंत्रालयात मंगळवारी (२ जून) झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीपूर्वी माध्यमांशी संवाद साधताना मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले की, शेतकरी कर्जमाफीचा प्रस्ताव जवळपास अंतिम टप्प्यात आहे. सरकारकडून आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यात येत आहे. मात्र, विधान परिषद निवडणुकीची आचारसंहिता आणि निवडणूक आयोगाच्या निर्देशांमुळे या निर्णयाची अधिकृत घोषणा करता येणार नाही.

निवडणूक आयोगानं कर्जमाफीसंदर्भातील प्रशासकीय प्रक्रिया पूर्ण करण्यास परवानगी दिली आहे. परंतु, त्याची सार्वजनिक घोषणा करण्यास परवानगी दिलेली नाही. त्यामुळे विधान परिषद निवडणुकीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शेतकरी कर्जमाफीची अधिकृत घोषणा करण्यात येईल,'' असं मुख्यमंत्री फडणवीसांनी स्पष्ट केलं.

दरम्यान, आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत शेतकरी कर्जमाफीबाबत महत्त्वाचा निर्णय घेतला जाण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत असून राज्यातील लाखो शेतकऱ्यांचं लक्ष या निर्णयाकडे लागलं आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांच्या विधानपरिषदेच्या निवडणुकीसाठी १८ जून रोजी मतदान, तर २२ जून रोजी मतमोजणी होणार असल्यानं राज्यात आचारसंहिता लागू झाली आहे. त्यामुळे सरकारला शेतकरी कर्जमाफीचा निर्णय सध्या अधिकृतपणे जाहीर करता येणार नाही.



येत्या ८ ते ९ दिवसांत निर्णय होणार- कृषीमंत्री : यापूर्वी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसांनी ३० जूनपूर्वी कर्जमाफीची घोषणा केली जाईल, असं सांगितलं होतं. तसेच कृषिमंत्री दत्ता भरणे यांनी रविवारी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्या उपस्थितीत येत्या ८ ते ९ दिवसांत निर्णय जाहीर करण्यात येईल, असं म्हटलं होतं. यामुळे या महिन्यात शेतकऱ्यांना कर्जमाफीबाबत दिलासा मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. मात्र, या कर्जमाफीसाठी कोणते निकष लागू असतील, याबाबत अद्याप कोणतीही अधिकृत माहिती समोर आलेली नाही.

कर्जमाफी कोणत्या निकषांवर दिली जाणार? - अजित नवले : कर्जमाफीबाबत प्रतिक्रिया देताना किसान सभेचे नेते अजित नवले म्हणाले, ''सरकारनं कर्जमाफीचा निर्णय यापूर्वीही घेतला आहे. त्यात काही नवीन नाही. मात्र ही कर्जमाफी कोणत्या निकषांवर दिली जाणार, हे महत्त्वाचं आहे. कोणत्या शेतकऱ्यांना कर्जमाफी मिळणार, किती रकमेपर्यंत लाभ दिला जाणार आणि कोणते शेतकरी त्यापासून वंचित राहणार, याबाबत स्पष्टता असणं गरजेचं आहे. तसेच नियमितपणे कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांबाबत सरकारची भूमिका काय असेल, हेही समोर आलं पाहिजे.''

ते पुढे म्हणाले, ''आचारसंहितेच्या आडून कर्जमाफीसंदर्भातील निर्णय गुप्तपणे घेऊन त्याची अंमलबजावणी करण्यात आली, तर ते योग्य ठरणार नाही. अशा महत्त्वाच्या निर्णयाची माहिती जनतेपर्यंत पारदर्शकपणे पोहोचली पाहिजे.'' त्यामुळे कर्जमाफीचे निकष काय असतील हे बघणं महत्त्वाचं असेल.

## कल्याण आरटीओ कार्यालयात दुचाकींसाठी 'MH 05 GM' नवीन मालिका सुरु; आकर्षक क्रमांकांसाठी ३ जूनपर्यंत अर्जांचे आवाहन

**ठाणे/प्रतिनिधी :** उप प्रादेशिक परिवहन कार्यालय, कल्याण येथे दुचाकी (Two-Wheeler) संवर्गासाठी 'MH 05 GM' ही नवीन नोंदणी मालिका साधारणतः दिनांक ५ जून २०२६ रोजी सुरू करण्यात येणार आहे. या नवीन मालिकेतील आकर्षक तसेच पसंतीचे क्रमांक (VIP Numbers) खरेदी करण्याची इच्छा असलेल्या वाहनधारकांसाठी अर्ज स्वीकारण्याची प्रक्रिया सुरू झाली असून, इच्छुकांनी आपले अर्ज विहित मुदतीत सादर करावेत, असे आवाहन कल्याणचे उप प्रादेशिक परिवहन अधिकारी श्री. आशुतोष बरकुल यांनी केले आहे. नवीन दुचाकी वाहनांसाठी आकर्षक क्रमांक मिळवू इच्छिणाऱ्या वाहन मालकांचे अर्ज दिनांक १ जून २०२६, २ जून २०२६ व ३ जून २०२६ रोजी कार्यालयीन वेळेत स्वीकारले जातील.

विहित मुदतीनंतर म्हणजेच ३ जून २०२६ नंतर येणाऱ्या कोणत्याही अर्जांचा आकर्षक क्रमांक वाटपासाठी विचार केला जाणार नाही. त्यामुळे सर्व संबंधित इच्छुक वाहन मालक आणि वाहन वितरकांनी (Dealers) या कालमर्यादेची नोंद घेऊन वेळेत अर्ज सादर करावेत, असे उप प्रादेशिक परिवहन कार्यालयामार्फत कळविण्यात आले आहे.

## ठाणे पोलीस आयुक्तालयामार्फत ७ जून रोजी 'संडे ऑन सायकल' उपक्रमाचे आयोजन; नागरिकांना मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन

**ठाणे/प्रतिनिधी :** भारत सरकारच्या क्रीडा विभागाच्या निर्देशानुसार, ठाणे पोलीस आयुक्तालय आणि ठाणे शहरातील नागरिकांच्या संयुक्त सहभागाने रविवार, दिनांक ७ जून २०२६ रोजी 'संडे ऑन सायकल' या विशेष उपक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. पोलीस दल आणि नागरिक यांच्यामध्ये शारीरिक सुदृढता (फिटनेस) वाढवून, आरोग्याला आपल्या दैनंदिन जीवनशैलीचा अविभाज्य भाग बनवणे हा या उपक्रमाचा मुख्य हेतू आहे. या सायकलिंग मोहिमेमध्ये ठाणेकर नागरिकांनी मोठ्या प्रमाणात सहभागी व्हावे, असे आवाहन मानव संसाधन विभागाचे सहाय्यक पोलीस आयुक्त श्री. मोहन पाटील यांनी केले आहे.

हा विशेष उपक्रम ७ जून रोजी सकाळी ठीक ६:०० वाजता ठाणे येथील साकेत मैदान येथून सुरू होणार आहे. साकेत मैदानावरून १० किलोमीटर अंतराची सायकल रॅली काढण्यात येणार असून, ती निर्धारित मार्गाने मार्गक्रमण करत पुन्हा साकेत मैदान येथेच येऊन पूर्ण होईल.

या आरोग्यदायी उपक्रमाला व्यापक स्वरूप देण्यासाठी ठाणे शहरातील महाविद्यालयांतून जास्तीत जास्त संख्येने शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी स्वतःच्या सायकलसह या रॅलीत सहभागी व्हावे. तसेच, संबंधित शैक्षणिक संस्थांनी आपल्या स्तरावरून या उपक्रमाची माहिती जास्तीत जास्त विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचवून प्रसार करावा, अशी विनंती पोलीस प्रशासनामार्फत करण्यात आली आहे.

## नीट पेपरफुटी प्रकरणातील पाच आरोपींच्या न्यायालयीन कोठडीत १५ जूनपर्यंत वाढ

नवी दिल्ली : दिल्लीतील राऊस अवेन्यू न्यायालयाने मंगळवारी नीट पेपरफुटी प्रकरणातील पाच आरोपींच्या न्यायालयीन कोठडीत १५ जूनपर्यंत वाढ केली.विशेष न्यायाधीश अजय गुप्ता यांनी सीबीआयने केलेली विनंती मान्य करत, मांगीलाल खाटिक, विकास बिवाल, दिनेश बिवाल, यश यादव आणि धनंजय लोखंडे या आरोपींच्या न्यायालयीन कोठडीत वाढ करण्यास परवानगी दिली.सुनावणीनंतर आरोपींचे वकील यादव यांनी सांगितले की, पुन्हा नियोजित करण्यात आलेल्या नीट परीक्षेच्या तयारीसाठी पुस्तके मिळण्याबाबत त्यांच्या यश यादवने केलेली विनंती न्यायालयाने मान्य केली आहे.दरम्यान, सोमवारी (१ जून २०२६) मनीषा संजय हवालदार, डॉ. मनोज शिरुरे आणि तेजस हर्षदकुमार शाह या आरोपींना १४ दिवसांच्या न्यायालयीन कोठडीत पाठवण्यात आले. या प्रकरणात सीबीआयने आतापर्यंत १३ आरोपींना अटक केली आहे.

## गोपाळगड किल्ल्याच्या मालकी व संवर्धनाबाबत १५ दिवसांत अहवाल सादर करा-मंत्री ॲड. शेलार

**मुंबई/प्रतिनिधी :** रत्नागिरी जिल्ह्यातील ऐतिहासिक गोपाळगड किल्ल्याच्या मालकी हक्क, कायदेशीर स्थिती आणि संवर्धनाच्या प्रश्नांवर सखोल अभ्यास करून पुढील १५ दिवसांत सविस्तर अहवाल सादर करण्याचे निर्देश सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड. आशिष शेलार यांनी रत्नागिरी जिल्हाधिकाऱ्यांना दिले.मंत्री ॲड.शेलार यांच्या अध्यक्षतेखाली मंत्रालयात आयोजित बैठकीत गोपाळगड किल्ल्याच्या मालकी हक्कासंदर्भातील वाद, न्यायालयीन प्रक्रिया, पुरातत्वीय महत्व आणि संभाव्य संपादन याबाबत सविस्तर चर्चा झाली.

## शैक्षणिक संस्थानी विशिष्ट दुकानातून खरेदी करण्याची सक्ती करू नका!

### व्ही एस पँथर्स विद्यार्थी आघाडी ची निवेदनाद्वारे शिक्षण उपसंचालकाकडे मागणी!



**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेचे सं अध्यक्ष विनोदभाऊ खटके यांच्या सूचनेनुसार विद्यार्थी आघाडीच्या वतीने शिक्षण उपसंचालक यांना निवेदन देऊन येत्या शैक्षणिक वर्षात लातूर जिल्ह्यातील शैक्षणिक संस्थांनी पालकांना विद्यार्थ्यांचे गणवेश बूट सॉक्स वह्या पुस्तके खरेदी करण्यासाठी विशिष्ट दुकानांचा आग्रह धरू नये यामुळे पालकांना विविध आर्थिक अडचणींना सामोरे जावे लागत आहे असे निदर्शनास येत आहे त्यासाठी शिक्षण उपसंचालक साहेबांनी शैक्षणिक संस्थांना शैक्षणिक वर्ष सुरू होण्यापूर्वी आदेशित करावे अन्यथा व्हीएस पँथर्स युवा संघटन आपल्या कार्यालयासमोर तीव्र आंदोलन छेडेल याची गंभीर देणे दखल घेण्यात यावी.

या निवेदनावर विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे जिल्हा कार्याध्यक्ष अकबर शेख जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड शहराध्यक्ष असद भाई शेख ऑटो युनियन तालुका उपाध्यक्ष विशाल गवळी फैयाज शेख आदींच्या स्वाक्षरी आहेत.

## भिवंडी येथील शासकीय मुला-मुलींच्या वसतिगृहात मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू

### ऑनलाईन अर्ज करण्याचे आवाहन

**ठाणे/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागांतर्गत भिवंडी येथे कार्यरत असलेल्या भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर शासकीय मुलांचे वसतिगृह आणि क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय मुलींचे वसतिगृह येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठी रिक्त जागांवर मोफत प्रवेश प्रक्रिया सुरू झाली आहे. इयत्ता ८ वी पासून पुढील शिक्षण घेणाऱ्या, तसेच महाविद्यालयीन विभागातील प्रथम वर्षात (इयत्ता ११ वी, १२ वी, पदविका/ डिप्लोमा, आयटीआय व इतर बिगर व्यावसायिक अभ्यासक्रम) प्रवेश घेतलेल्या गरजू व पात्र विद्यार्थ्यांना या सुविधेचा लाभ घेता येईल.

इच्छुक विद्यार्थ्यांनी https://hms.mahait.org या अधिकृत पोर्टलद्वारे ऑनलाईन पद्धतीने आपले अर्ज सादर करावेत, असे आवाहन वसतिगृहाच्या गृहपालांनी केले आहे.

प्रवेश अर्ज व प्रक्रियेचे वेळापत्रक: शालेय वर्ग वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करावयाचा अंतिम दि.३० जून २०२६ पर्यंत तर प्रवेश प्रक्रिया अंतिम करावयाचा दिनांक दि.०७ जून २०२६ असा आहे. इयत्ता ११ व १२ वी वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करावयाचा अंतिम दि.१५ जुलै २०२६ पर्यंत तर प्रवेश प्रक्रिया अंतिम करावयाचा दिनांक दि.३१ जुलै २०२६ असा आहे. बिगर व्यावसायिक वसतिगृह प्रवेशासाठी अर्ज करावयाचा अंतिम दि.१५ जुलै २०२६ पर्यंत तर प्रवेश प्रक्रिया अंतिम करावयाचा दिनांक दि.३१ जुलै २०२६ असा आहे. अर्जासोबत आवश्यक असणारी कागदपत्रे (अपलोड करण्यासाठी): १. मागील वर्षाची गुणपत्रिका (Marksheet) व शाळा सोडल्याचा दाखला (T.C.), २. सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेला जातीचा दाखला, ३. सक्षम प्राधिकाऱ्याचा वार्षिक उत्पन्नाचा दाखला (वार्षिक उत्पन्न मर्यादा रु. २,५०,०००/- च्या आत), ४. रहिवासी दाखला (सरपंच/तलाठी/नगरसेवक यांनी प्रमाणित केलेला), ५. ओळखपत्रासाठी आधार कार्ड, ६. शाळा/महाविद्यालयाचे बोनाफाइड प्रमाणपत्र अथवा प्रवेश शुल्क पावती, ७. आधार संलग्न (Linked) बँक खाते पासबुकच्या पहिल्या पानावरील छायांकित प्रत, ८. पासपोर्ट आकाराचा फोटो ऑनलाईन पद्धतीने भरलेल्या प्रवेश अर्जाची छायांकित प्रत (Hard Copy) 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर मुलांचे शासकीय वसतिगृह / क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले शासकीय मुलींचे वसतिगृह, मानसरोवर शॉपिंग कॉम्प्लेक्स, पहिला व दुसरा मजला, भिवंडी, जि. ठाणे' येथे जमा करणे आवश्यक आहे. अधिक माहितीसाठी गृहपाल श्री. प्रणय मडावी आणि श्रीमती प्रज्ञा खेसे यांच्याशी (मोबाईल क्र. ९७६७६१२८९७ / ७०३८८६६८०२) संपर्क साधावा. शासकीय नियमांनुसार प्रवेशित विद्यार्थ्यांना निवास व्यवस्थेसह खालील सुविधा मोफत व सशुल्क तरतुदींनुसार पुरविल्या जातात: १. दोन वेळचे दर्जेदार भोजन, सकाळी नाश्ता, दूध, फळे आणि अंडी. २. डीबीटी (DBT) द्वारे मिळणारे थेट शैक्षणिक लाभ: शैक्षणिक स्टेशनरी: रु. ४,०००/- प्रतिवर्ष, गणवेश भत्ता: शालेय विद्यार्थ्यांसाठी रु. १,०००/- आणि महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी रु. २,०००/- (ड्रेस कोड लागू असल्यास), शैक्षणिक सहल: रु. २,०००/- प्रतिवर्ष, शैक्षणिक प्रकल्प: रु. १,०००/- प्रतिवर्ष, निर्वाह भत्ता: रु. १,०००/- दरमहिन्याला, ३. इतर भौतिक सुविधा: सुसज्जित संगणक कक्ष, ग्रंथालय, दैनंदिन वृत्तपत्रे, स्पर्धा परीक्षा मासिके, मनोरंजन कक्ष (टी.व्ही.) आणि क्रीडा साहित्य.

## रायगडावर होणाऱ्या शिवराज्याभिषेक सोहळ्यासाठी लातूरच्या कलाधिराज पथकाला ढोलवादनाचा मान

### समन्वयक सतीश कारंडे यांची पत्रकार परिषदेत माहिती

**लातूर/प्रतिनिधी :** अखिल भारतीय शिवराज्याभिषेक महोत्सव समितीच्या वतीने दुर्गराज रायगड किल्ल्यावर प्रतीवर्षाप्रमाने ५ व ६ जून रोजी शिवराज्याभिषेक सोहळा उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. त्यानिमित्त रायगडाच्या महा दरवाजा जवळ ढोलवादनाचा मुख्य मान लातूरच्या कलाधिराज प्रतिष्ठानला मिळाला आहे. ५० कलावंताचे हे ढोल ताशा पथक आहे. या शिवराज्याभिषेक सोहळ्याला लातूर जिल्ह्यातून शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन या सोहळ्याचे लातूर जिल्हा समन्वयक सतीश कारंडे यांनी लातूर येथील पत्रकार भवन येथे आयोजित पत्रकार परिषदेत केले.

शिवराज्याभिषेक सोहळा समितीचे मार्गदर्शक युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराजकुमार शहाजी राजे छत्रपती यांच्या प्रमुख उपस्थितीत होणार आहे. ५ जून रोजी दुपारी साडेतीन वाजता लातूरच्या कलाधिराज पथकाचे ढोल वादन व पूजा होणार आहे. पाचाड येथे राजमाता जिजाऊ साहेब यांच्या समाधी स्थळास अभिवादन करून शिवराज्याभिषेक सोहळ्याला प्रारंभ होणार आहे. त्यानंतर प्रमुख अतिथी रायगडावर पायी प्रस्थान करणार आहेत. नगारखाना येथे गडपूजन करण्यात येणार आहे. त्यानंतर ढोलवादन, लेझिम पथक, वारकरी संप्रदायाकडून टाळ मृदंगाचा गजर, जागर शिवशाहीरांचा, शिरकाई देवीचा गोंधळ, युद्ध कलेची प्रात्यक्षिके, ध्वजारोहन, शिवछत्रपतींच्या पालखीचे राजसद्रेवर आगमन, शिवछत्रपतींच्या उत्सव मूर्तीचा युवराज संभाजी छत्रपती महाराज व युवराज



छत्रपती शहाजी राजे यांच्या हस्ते सुवर्ण मुद्रांचा अभिषेक करण्यात येणार आहे. छत्रपती शिवाजी महारांजाच्या समाधी स्थळास अभिवादन करण्यात येणार आहे. असे विविध कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आली असून या भव्य दिव्य अशा शिवराज्याभिषेक दिन सोहळ्यास शिवभक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन सतीश कारंडे यांनी केले आहे. या पत्रकार परिषदेला कलाधिराज प्रतिष्ठानचे सचिव खुशी करंडे, आर्यन गुंजाळ, अमृता कांबळे, अविनाश हुलगुंडे,अशा घोडके व पथक प्रमुख अमित डावरे आदींची उपस्थिती होती.

## संपादकीय...

# सरकारचे लक्ष फक्त विरोधकांना संपवण्यावर; सामान्य जनतेचे काय?

लोकशाही व्यवस्थेत सत्ताधारी आणि विरोधक हे एका नाण्याच्या दोन बाजू असतात. सत्ताधारी पक्ष शासन चालवतो, तर विरोधक सरकारच्या धोरणांवर प्रश्र्न उपस्थित करून जनतेच्या हिताचे रक्षण करण्याचे काम करतात. परंतु अलीकडील काळात राजकीय वातावरण पाहिले असता, अनेकांना असा प्रश्र्न पडू लागला आहे की सरकारचे लक्ष जनतेच्या समस्यांवर कमी आणि विरोधकांना राजकीयदृष्ट्या कमकुवत करण्यावर अधिक केंद्रित झाले आहे का? देशात महागाई, बेरोजगारी, शेतकऱ्यांचे प्रश्र्न, शिक्षण आणि आरोग्य क्षेत्रातील अडचणी यांसारखे अनेक गंभीर विषय आहेत. सामान्य नागरिक रोजच्या जीवनात या समस्यांचा सामना करत आहे. मात्र सार्वजनिक चर्चेचा मोठा भाग विरोधकांवरील आरोप, चौकशा, पक्षांतर आणि राजकीय संघर्ष यांभोवती फिरताना दिसतो. लोकशाहीत कायद्याचे राज्य असणे आवश्यक आहे. भ्रष्टाचार किंवा गैरव्यवहार झाला असेल तर चौकशी होणे गरजेचेच आहे. परंतु अशा कारवाया केवळ विरोधी पक्षांपुरत्याच मर्यादित असल्याचा आभास निर्माण झाला तर लोकांच्या मनात संशय निर्माण होणे स्वाभाविक आहे. न्यायव्यवस्था आणि तपास यंत्रणांवरील विश्र्वास टिकवून ठेवणे हे कोणत्याही सरकारचे कर्तव्य असते. आज देशातील अनेक कुटुंबे वाढत्या महागाईमुळे आर्थिक संकटाचा सामना करत आहेत. पेट्रोल, डिझेल, गॅस, अन्नधान्य आणि दैनंदिन गरजेच्या वस्तूंच्या किंमती वाढल्यामुळे सर्वसामान्यांचे घरगुती बजेट कोलमडत आहे. या प्रश्र्नांवर ठोस उपाययोजना अपेक्षित असताना राजकीय संघर्ष अधिक चर्चेत राहतो. बेरोजगारी हा तरुणांसमोरील सर्वात मोठा प्रश्र्न आहे. लाखो युवक शिक्षण पूर्ण करून नोकरीच्या शोधात आहेत. रोजगारनिर्मिती, उद्योगवाढ आणि कौशल्य विकास यांसारख्या विषयांना सर्वोच्च प्राधान्य मिळायला हवे. परंतु अनेकदा हे मुद्दे राजकीय गदारोळात मागे पडतात. शेतकरी वर्गाची परिस्थिती देखील चिंताजनक आहे. उत्पादन खर्च वाढत आहे, नैसर्गिक संकटे वाढत आहेत आणि उत्पन्नाची अनिश्र्चितता कायम आहे. अशा वेळी कृषी क्षेत्रासाठी दीर्घकालीन धोरणे आखणे आवश्यक आहे. मात्र राजकीय संघर्षामुळे या विषयांवर अपेक्षित चर्चा होताना दिसत नाही. सत्ताधारी पक्षाला विरोधकांवर टीका करण्याचा अधिकार आहे, तसेच विरोधकांनाही सरकारवर प्रश्र्न उपस्थित करण्याचा अधिकार आहे. पण हे करताना जनतेच्या मूलभूत प्रश्र्नांकडे दुर्लक्ष होता कामा नये. लोकांनी सरकार निवडून दिले आहे ते त्यांच्या समस्या सोडवण्यासाठी, राजकीय प्रतिस्पर्ध्यांशी अखंड संघर्ष करण्यासाठी नव्हे. माध्यमांची भूमिकाही येथे महत्त्वाची ठरते. जनतेच्या प्रश्र्नांवर प्रकाश टाकण्याऐवजी जर राजकीय वादांनाच अधिक प्रसिद्धी मिळाली, तर लोकांच्या वास्तविक समस्या चर्चेच्या केंद्रस्थानी येत नाहीत. लोकशाहीच्या आरोग्यासाठी ही स्थिती हितावह नाही. सत्तेचा खरा अर्थ जनसेवा आहे. सरकार कोणत्याही पक्षाचे असो, त्याचे पहिले कर्तव्य नागरिकांचे जीवनमान उंचावणे हेच असते. महागाई कमी करणे, रोजगार उपलब्ध करून देणे, शिक्षण आणि आरोग्य सुविधा सुधारणे या गोष्टींना प्राधान्य दिले गेले पाहिजे. विरोधकांना संपवण्याचा प्रयत्न करून लोकशाही मजबूत होत नाही. उलट सक्षम आणि जबाबदार विरोधक हे लोकशाहीचे संरक्षण करतात. मतभेद असले तरी त्यांचा आदर करणे ही लोकशाहीची मूलभूत अट आहे. आज गरज आहे ती राजकीय संघर्षापेक्षा लोकहिताच्या राजकारणाची. सरकारने आपल्या ऊर्जा आणि संसाधनांचा मोठा भाग जनतेच्या प्रश्र्नांच्या समाधानासाठी खर्च करणे आवश्यक आहे. कारण शेवटी नागरिकांना राजकीय विजयापेक्षा रोजगार, परवडणारे जीवन आणि सुरक्षित भविष्य अधिक महत्त्वाचे वाटते. लोकशाहीत अंतिम न्यायाधीश जनता असते. जनतेच्या अपेक्षा, समस्या आणि गरजा दुर्लक्षित करून कोणतेही सरकार दीर्घकाळ लोकांचा विश्र्वास टिकवू शकत नाही. त्यामुळे सरकारने विरोधकांविरुद्धच्या राजकारणापेक्षा जनकल्याणाच्या कार्यावर अधिक भर दिला, तर तेच देशाच्या आणि लोकशाहीच्या हिताचे ठरेल.

# मतपत्रिकेकडे पुनरागमन की ईव्हीएमवर विश्वास? : लोकशाहीच्या विश्वासार्हतेचा निर्णायक प्रश्न

भारताच्या निवडणूक प्रक्रियेत इलेक्ट्रॉनिक मतदान यंत्रे (ईव्हीएम) आणि मतदार पडताळणी यंत्रणा (व्हीव्हीपॅट) यांचा वापर गेल्या दोन दशकांपासून मोठ्या प्रमाणावर होत आहे. निवडणूक आयोगाच्या मते ही प्रणाली जलद, अचूक आणि पारदर्शक आहे. मात्र प्रत्येक निवडणुकीनंतर ईव्हीएमच्या विश्वासार्हतेबाबत प्रश्न उपस्थित होताना दिसतात. अलीकडेच पंजाबमध्ये पुन्हा एकदा मतपत्रिकेवर मतदान घेण्याची मागणी काही राजकीय पक्ष आणि सामाजिक गटांकडून करण्यात आली. त्याच अनुषंगाने उत्तर प्रदेशातील २०२७ च्या विधानसभा निवडणुका मतपत्रिकेवर घ्याव्यात का, हा प्रश्न आता सार्वजनिक चर्चेचा विषय बनला आहे. या प्रश्नाकडे केवळ राजकीय चष्म्यातून पाहणे योग्य ठरणार नाही. कारण हा मुद्दा थेट लोकशाहीच्या विश्वासार्हतेशी आणि मतदारांच्या मनातील निवडणूक प्रक्रियेबद्दलच्या विश्वासाशी संबंधित आहे.

भारतासारख्या विशाल लोकशाही राष्ट्रात निवडणुका म्हणजे जगातील सर्वात मोठा लोकशाही उत्सव. लाखो कर्मचारी, हजारो उमेदवार आणि कोट्यवधी मतदार या प्रक्रियेत सहभागी होतात. अशा परिस्थितीत मतपत्रिकेऐवजी ईव्हीएमचा वापर सुरू करण्यामागे अनेक व्यावहारिक कारणे होती. मतमोजणीतील विलंब, मोठ्या प्रमाणावर होणारे अवैध मतदान, मतपत्रिका लुटणे, बनावट मतदान आणि मतमोजणीतील मानवी चुका या समस्यांवर उपाय म्हणून ईव्हीएमचा स्वीकार करण्यात आला. खरे तर ईव्हीएममुळे निवडणूक निकाल काही तासांत जाहीर होऊ लागले. खर्चात बचत झाली. मतपत्रिकांच्या छपाईवर होणारा कोट्यवधी रुपयांचा खर्च वाचला. मतदान केंद्रांवरील व्यवस्थापन सुलभ झाले. त्यामुळे निवडणूक आयोग ईव्हीएम प्रणालीचे सातत्याने समर्थन करत आला आहे.

परंतु दुसरी बाजूही दुर्लक्षित करता येणार नाही. अनेक राजकीय पक्ष, निवृत्त प्रशासकीय अधिकारी, तंत्रज्ञान क्षेत्रातील काही तज्ज्ञ आणि नागरिक संघटना ईव्हीएमबाबत शंका व्यक्त करत आहेत. त्यांचा मुख्य युक्तिवाद असा आहे की कोणतीही इलेक्ट्रॉनिक प्रणाली शंभर टक्के त्रुटीमुक्त असू शकत नाही. यंत्रामध्ये फेरफार झाला नाही याची खात्री जनतेला कशी मिळणार? निवडणुकीतील पराभवानंतर अनेक पक्षांनी ईव्हीएमवर आरोप केले आहेत. विशेष म्हणजे सत्ताधारी आणि विरोधक या दोन्ही बाजूंनी वेगवेगळ्या काळात अशा शंका व्यक्त केल्या आहेत. याच ठिकाणी प्रश्न फक्त ईव्हीएमचा राहत नाही तर तो लोकशाहीतील विश्वासाचा बनतो. एखादी निवडणूक निष्पक्ष झाली असली तरी जनतेच्या मनात संशय निर्माण झाला तर लोकशाही कमकुवत होते. निवडणूक प्रक्रियेवरील विश्वास हा निकालापेक्षा अधिक महत्त्वाचा असतो.

मतपत्रिकेच्या समर्थनार्थ बोलणाऱ्यांचे म्हणणे आहे की कागदी मतपत्रिका हा सर्वसामान्य नागरिकाला सहज समजणारा आणि पडताळता येणारा पर्याय आहे. मतदाराने दिलेले मत प्रत्यक्ष कागदावर नोंदवले जाते. आवश्यक असल्यास पुन्हा मोजणी करता येते. त्यामुळे पारदर्शकता वाढते. जगातील अनेक विकसित देश आजही कागदी मतपत्रिकांचा वापर करतात, हेही या गटाचे प्रमुख म्हणणे आहे. मात्र मतपत्रिका प्रणालीही निर्दोष नव्हती. भारताने अनेक दशकांपर्यंत मतपत्रिकेवर निवडणुका घेतल्या आणि त्या काळात बूथ कॅप्चरिंग, मतपेट्या पळविणे, खोट्या मतांची भर घालणे आणि मतमोजणीतील वाद यासारख्या गंभीर समस्या वारंवार समोर आल्या. अनेक ठिकाणी निवडणूक निकालांसाठी अनेक दिवस प्रतीक्षा करावी लागत असे. त्यामुळे फक्त मतपत्रिका आली म्हणजे सर्व प्रश्न सुटतील, असेही म्हणता येणार नाही.

यापेक्षा महत्त्वाचा मुद्दा म्हणजे मतदारांच्या शंका दूर करण्यासाठी कोणती उपाययोजना करता येईल? लोकशाहीत जनतेचा विश्वास सर्वोच्च असतो. जर मोठा वर्ग ईव्हीएमबद्दल प्रश्न विचारत असेल तर त्यांना ‘‘तुमच्या शंका चुकीच्या आहेत’’ असे म्हणून गप्प बसवणे योग्य नाही. उलट अधिक पारदर्शकता, अधिक पडताळणी आणि अधिक सार्वजनिक सहभाग यावर भर दिला पाहिजे. आज व्हीव्हीपॅट प्रणाली अस्तित्वात आहे. मतदाराने दिलेले मत काही सेकंदांसाठी स्क्रीनवर दिसते आणि त्याची कागदी नोंदही तयार होते. परंतु प्रत्यक्षात सर्व व्हीव्हीपॅट चिठ्ठ्यांची मोजणी केली जात नाही. त्यामुळे अनेकांचे समाधान होत नाही. जर निवडणूक आयोगाने व्हीव्हीपॅट पडताळणीचे प्रमाण वाढवले किंवा विशिष्ट परिस्थितीत सर्व मतांची कागदी पडताळणी करण्याची यंत्रणा विकसित केली, तर अनेक शंका दूर होऊ शकतात.

उत्तर प्रदेशासारख्या विशाल राज्यात २०२७ मध्ये मतपत्रिकेवर निवडणूक घेणे हा केवळ तांत्रिक प्रश्न नाही तर तो आर्थिक, प्रशासकीय आणि सुरक्षा व्यवस्थेशी संबंधित आहे. कोट्यवधी मतपत्रिका छापणे, त्यांचे वितरण, सुरक्षित साठवणूक, मतमोजणी आणि निकाल प्रक्रिया यासाठी प्रचंड मनुष्यबळ व खर्च लागेल. त्यामुळे मतपत्रिकेच्या बाजूने बोलणाऱ्यांनी या व्यावहारिक बाबींचाही विचार करणे आवश्यक आहे. दुसरीकडे ईव्हीएम समर्थकांनीही जनतेच्या प्रश्नांना अहंकारी पद्धतीने नाकारण्याऐवजी त्यांची उत्तरे देण्याची तयारी दाखवली पाहिजे. लोकशाहीत प्रश्न विचारणे हा नागरिकांचा अधिकार आहे. निवडणूक आयोग, तंत्रज्ञ आणि राजकीय पक्ष यांनी एकत्र येऊन अधिक विश्वासार्ह आणि सर्वमान्य प्रणाली निर्माण करण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. आज गरज आहे ती ईव्हीएम विरुद्ध मतपत्रिका या संघर्षाची नाही, तर निष्पक्ष आणि सर्वमान्य निवडणूक प्रक्रियेची. कोणतीही प्रणाली अंतिम सत्य नसते. काळानुसार सुधारणा कराव्या लागतात. जर जनतेचा विश्वास वाढवण्यासाठी मतपत्रिका, व्हीव्हीपॅट किंवा अन्य कोणती तांत्रिक सुधारणा आवश्यक असेल, तर त्यावर खुली चर्चा होणे आवश्यक आहे.

लोकशाही केवळ मतदानाने जिवंत राहत नाही तर ती विश्वासाने जिवंत राहते. मतदाराला आपल्या मताचा सन्मान होत असल्याची खात्री वाटली पाहिजे. निवडणुकीचा निकाल कोणाच्या बाजूने लागतो हा दुय्यम मुद्दा आहे, परंतु निकाल कसा लागला याबद्दल सर्वांना समाधान असणे हा प्राथमिक मुद्दा आहे. २०२७ मध्ये उत्तर प्रदेशात मतपत्रिकेवर मतदान व्हावे की ईव्हीएमवर, याचा अंतिम निर्णय निवडणूक आयोग आणि कायदे करणाऱ्या संस्थांना घ्यायचा आहे. मात्र या चर्चेने एक गोष्ट स्पष्ट केली आहे की, भारतीय मतदार आता अधिक सजग झाला आहे. तो फक्त मतदान करत नाही, तर मतदान प्रक्रियेबाबतही प्रश्न विचारत आहे. आणि प्रश्न विचारणारा नागरिक हीच सशक्त लोकशाहीची खरी ओळख आहे.



प्रवीण बागडे
नागपूर
मो.क्र. ९९२३६२०९१९

# वारकरी संप्रदाय आणि संस्कृती




महाराष्ट्राची संतपरंपरा, भक्तीभाव, समता आणि मानवतेचा संदेश देणारा महान आध्यात्मिक प्रवाह म्हणजे वारकरी संप्रदाय होय. वारी म्हणजे विठ्ठलाच्या दर्शनासाठी भक्तांनी केलेली पायी यात्रा, आणि वारकरी म्हणजे नियमितपणे ही वारी करणारा भक्त. हा संप्रदाय केवळ धार्मिक परंपरा नसून तो महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक आणि नैतिक जीवनाचा आत्मा आहे. वारकरी संप्रदायाची परंपरा संत ज्ञानेश्र्वर महाराज, संत नामदेव, संत एकनाथ, संत तुकाराम महाराज, संत जनाबाई, संत चोखामेळा यांसारख्या महान संतांच्या कार्यातून समृद्ध झाली. या संतांनी समाजाला प्रेम, समता, बंधुता, सदाचार आणि ईश्र्वरभक्तीचा मार्ग दाखविला. विठ्ठल ही भक्तीची केंद्रबिंदू असली तरी या संप्रदायाचा खरा संदेश मानवसेवा आणि समाजप्रबोधन हाच आहे. पंढरपूरची आषाढी आणि कार्तिकी वारी ही महाराष्ट्राच्या संस्कृतीची अमूल्य परंपरा आहे. लाखो वारकरी टाळ–मृदंगाच्या गजरात, ज्ञानोबा–तुकोबाच्या जयघोषात पायी चालत पंढरपूरला जातात. या यात्रेत श्रीमंत–गरीब, उच्च–नीच, जात–पात, स्त्री–पुरुष असा कोणताही भेदभाव नसतो. सर्वजण एकाच दिंडीत, एकाच नामस्मरणात सहभागी होतात. त्यामुळे वारकरी संप्रदाय सामाजिक समतेचे सर्वोत्तम उदाहरण ठरतो. वारकरी संस्कृतीमध्ये साधेपणा, शिस्त, स्वच्छता, संयम आणि नैतिकता यांना विशेष महत्त्व आहे. वारकरी लोक अभंग, भजन, कीर्तन आणि हरिनाम सप्ताहाच्या माध्यमातून समाजात चांगले विचार पोहोचवतात. संत तुकाराम महाराजांनी आपल्या अभंगातून मानवता आणि सर्वधर्मसमभावाचा संदेश दिला. त्यांनी अल्लाहचा उल्लेख करत म्हटले आहे –

अल्ला देवे अल्ला दिलावे //
अल्ला दर्या अल्ला खिलावे//

या अभंगातून संत तुकाराम महाराजांनी ईश्र्वर एकच आहे, तो सर्वांचा पालनकर्ता आहे, असा व्यापक मानवतावादी संदेश दिला आहे. वारकरी परंपरेत धर्मांधतेला स्थान नसून प्रेम, सहिष्णुता आणि बंधुभावाला सर्वोच्च महत्त्व दिले जाते. संत तुकाराम महाराजांचेच हे वचन आजही समाजाला मानवतेची शिकवण देते –

जे का रंजले गांजले
त्यासी म्हणे जो आपुले

या ओळींमधून दीन–दुबळ्यांप्रती करुणा, प्रेम आणि सेवा यांचा संदेश दिला जातो. त्यामुळे वारकरी संप्रदाय हा केवळ भक्तीचा नव्हे तर मानवतेचा आणि सामाजिक समतेचाही महान प्रवाह आहे. औसा येथील श्रीनाथ संस्थानचे पाच पिढ्यापासून आज पर्यंत पिठाधिपती ह भ प गुरुबाबा महाराज औसेकर आणि विठ्ठल रुक्मिणी मंदिर समिती पंढरपूर चे अध्यक्ष ह भ प गहिनीनाथ महाराज औसेकर यांनीही वारकरी संस्कृती जपण्यासाठी आणि समाजात भक्ती, नैतिकता व सामाजिक ऐक्य वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. संस्थानामार्फत चक्रीभजन, कीर्तन, हरिनाम सप्ताह, धार्मिक प्रवचने आणि सामाजिक उपक्रम आयोजित केले जातात. वारकरी परंपरेतील संतविचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे कार्य संस्थान सातत्याने करीत आहे. ग्रामीण भागातील युवकांमध्ये अध्यात्म, संस्कार आणि समाजसेवेची भावना निर्माण करण्यामध्ये या संस्थेचे मोठे योगदान आहे.श्रीनाथ संस्थानशी मुस्लिम समाजाचे संबंध ही जग जाहीर आहे. कधीही जात, धर्म, पंथ आदीचा विचार या संसंस्थान मध्ये होत नाही.हीच वारकरी संप्रदाय आणि संस्कृती ची खरी परंपरा व संतांना अभिप्रेत आहे. वारकरी परंपरेत स्त्रियांचाही मोठा सहभाग आहे. संत जनाबाई, बहिणाबाई यांसारख्या संतस्त्रियांनी भक्ती आणि समाजजागृतीचे कार्य केले. त्यामुळे हा संप्रदाय स्त्री–पुरुष समानतेचाही संदेश देतो. आजच्या आधुनिक आणि धावपळीच्या जीवनात माणूस तणाव, स्वार्थ आणि भौतिकवादात अडकत चालला आहे. अशा वेळी वारकरी संस्कृती माणसाला प्रेम, शांतता, सहकार्य आणि अध्यात्माची शिकवण देते. वारकरी परंपरा ही फक्त देवभक्ती नसून ती जीवन जगण्याची एक सुंदर पद्धत आहे. वारकरी संप्रदायाने महाराष्ट्राला संतसाहित्य, अभंग, कीर्तन, भारूड आणि लोकसंस्कृतीचा अमूल्य वारसा दिला आहे. ही परंपरा आजही समाजाला नैतिक मूल्ये आणि मानवतेची प्रेरणा देत आहे. त्यामुळे वारकरी संस्कृती जपणे आणि पुढील पिढीपर्यंत पोहोचवणे ही आपल्या सर्वांची जबाबदारी आहे. शेवटी असे म्हणता येईल की, वारकरी संप्रदाय हा महाराष्ट्राच्या संस्कृतीचा प्राण आहे. तो भक्तीबरोबरच मानवता, समता, बंधुता आणि सदाचार यांचे महान विद्यापीठ आहे. विठ्ठल नामाच्या आधाराने समाजाला एकत्र आणणारी ही परंपरा खऱ्या अर्थाने भारतीय संस्कृतीचे उज्ज्वल प्रतीक आहे.

-------------------

**कबीर वाणी**
**– म. मुस्लिम कबीर, औसा**
८२०८४३५४१४

# तुमचे डोळे सुदृढ ठेवण्यासाठी फॉलो करा या साध्या ६ साध्या सवयी!



आजच्या जगात स्क्रीन पाहण्यावर कोणताच अंकुश राहिलेला नाही. हा वाढलेला स्क्रीन टाईम आणि घरातच बंदिस्त राहण्याची जीवनशैली आपल्या डोळ्यांना – प्रामुख्याने रेटिनाला त्रासदायक ठरते. रेटिना हा आपल्या डोळ्यांच्या मागच्या बाजूला असतो. त्याचे कार्य एखाद्या लहान कॅमेराप्रमाणे चालते. तो प्रकाश टिपतो आणि तुमच्या मेंदूला सिग्नल देतो. जेणेकरून तुम्ही सभोवताल पाहू शकता. एकदा का या रेटिनाला इजा झाली की तुम्ही कायमची दृष्टी गमावून बसता. मात्र शुभ बातमी? काही प्रमाणात साध्या–सोप्या नियमित सवयींचे पालन केल्यास तुमच्या डोळ्यांचे दीर्घकालीन संरक्षण शक्य आहे. जेणेकरून तुमची दृष्टी तीक्ष्ण राहते.

१. तुमच्या डोळ्यांना द्या योग्य इंधन

तुम्ही कशाचे सेवन करता हे तुमच्या विचारांहून अधिक महत्त्वाचे आहे. पालक आणि गाजरासारख्या चमकदार भाज्या, संत्र्यासारखी रसाळ फळे आणि मूठभर शेंगदाण्यांमध्ये अ, क आणि ई जीवनसत्त्वे असतात – जी निरोगी डोळ्यांसाठी आवश्यक असतात. ओमेगा–३ फॅटी ॲसिड्स देखील महत्त्वपूर्ण ठरतात. तुम्हाला ते सालमनसारख्या माशांमध्ये किंवा फ्लेक्स सीड्स (अळशी), चिया सीड्स (सब्जा), अक्रोड आणि सोयाबीनसारख्या वनस्पती स्रोतांमध्ये आढळतील. ही पोषक तत्त्वे तुमच्या दृष्टिपटलाला मजबूत ठेवण्यास मदत करतात. तसेच वयाशी संबंधित दृष्टी समस्यांचा धोका कमी करतात. याबद्दल डॉ. सुप्रिया तडकसे

मोतिबिंदूग्लुकोमामेडिकल रेटिना, डॉ अग्रवालस् आय हॉस्पिटल, औंध यांच्याकडून अधिक माहिती जाणून घेऊयात.

२. स्वत:च्या डोळ्यांचे सूर्यापासून संरक्षण करा

यूव्ही रेज निव्वळ तुमच्या त्वचेला हानी करत नाहीत तर तुमच्या रेटिनालाही धक्का पोहोचवू शकतात. मॅक्युलर डिजनरेशनसारखी जोखीम धोक्यांत भर घालणारी ठरते. सनग्लासेसचा वापर १००म यूव्हीए किरणांना अटकाव करू शकतो. सोबतच डोक्याला आच्छादन देणारी हॅट घराबाहेर तुमचा दोस्त ठरतो.

३. रक्तातील साखर तसेच रक्तदाब नियंत्रित ठेवा

रक्तात मोठ्या प्रमाणावरील साखर आणि उच्च रक्तदाब आपल्या दृष्टिपटलातील लहान रक्तवाहिन्यांना शांतपणे नुकसान पोहोचवतात. संतुलित आहार घेणे, सक्रिय जीवनशैली आणि नियमित आरोग्य तपासणी केल्याने मधुमेह किंवा उच्च रक्तदाब असलेल्या दृष्टिपटलातील बदलांसारख्या गुंतागुंती टाळण्यास मदत होऊ शकते.

४. २०–२०–२० नियम पाळा

सगळीकडे स्क्रीन आहेत आणि त्यांच्याकडे पाहताना तुमच्या डोळ्यांवर ताण येतो. दर २० मिनिटांनी, २० सेकंदांसाठी २० फूट दूर काहीतरी पाहण्याची सवय लावा. घरून काम करताय? तुमचा डेस्क खिडकीजवळ ठेवा जेणेकरून तुम्ही नैसर्गिकरित्या या नियमाचे पालन करू शकाल आणि डोळ्यांना विश्रांती देऊ शकाल.

५. धूम्रपान टाळा

धूम्रपानामुळे दृष्टिपटलातील हानी वाढते आणि दृष्टी कमी होण्याचा धोका वाढतो. सोडणे – किंवा सेकंडहँड धुरापासून दूर राहणे – हा तुमच्या दृष्टीचे रक्षण करण्याचा सर्वात सोपा मार्ग आहे.

६. दरवर्षी डोळ्यांची तपासणी करा

दृष्टिपटलातील अनेक समस्या हळूहळू विकसीत होतात. जेव्हा उपचार सर्वात प्रभावी असतो, तेव्हा दरवर्षीच्या डोळ्यांच्या तपासणीमुळे मॅक्युलर डिजनरेशन किंवा रेटिनल अश्रू यासारख्या समस्यांचा शोध लवकर लावण्यात मदत होते.

निष्कर्ष

तुमची दृष्टी अमूल्य आहे. या सहा सवयी आजच स्वीकारा आणि आगामी काळात स्वच्छ, निरोगी दृष्टीचा आनंद घेण्यासाठी नियमित डोळ्यांच्या तपासणीला प्राधान्य द्या.

## विविध वृत्त...

### गुजरात सीमेवर एसटी बसचा भीषण अपघात, ७ प्रवाशांचा होरपळून मृत्यू

**धुळे/प्रतिनिधी :** गुजरातच्या बारडोलीजवळ महाराष्ट्र राज्य परिवहन मंडळाच्या दोन बस आणि ट्रॅक्टरच्या विचित्र अपघात झाला. या अपघातामुळे बसला लागलेल्या आगीत होरपळून सात प्रवाशांचा मृत्यू झाला. ठळक बातम्या

मंगळवारी संध्याकाळी गुजरातच्या बारडोलीजवळ तिहेरी अपघात झाला. सुरतहून धुळ्याकडे जाणाऱ्या एसटी बसला ट्रॅक्टरने धडक दिली. या धडकेनंतर सुरत– धुळे बस ही विरुद्ध दिशेने येणाऱ्या जळगाव–सुरत बसला जाऊन धडकली. ही धडक इतकी भीषण होती की जळगाव आगारातून निघालेली बस दोन वेळा पलटली आणि बसने पेट घेतला. ही आग भीषण असल्यान बसमधील प्रवाशांना बाहेर पडण्याची संधीच मिळाली नाही. या आगीत आत्तापर्यंत सात प्रवाशांचा मृत्यू झाल्याचे वृत्त आहे.

घटनास्थळी पोलिस पोहोचले असून बचावकार्य सुरू आहे. बसमध्ये नेमके किती प्रवासी होते हे अद्याप समजू शकले नाही. आगीची तीव्रता पाहता मृतांचा आकडा वाढण्याची भीती व्यक्त होत आहे.

महाराष्ट्राच्या आगारातील अधिकारी अपघातस्थळी रवाना

सुरत प्रशासनाने अपघाताची माहिती धुळे एसटी डेपोला दिली. अपघाताचे वृत्त समजताच आगारातील अधिकाऱ्यांनी तातडीने बारडोलीला धाव घेतली. या अपघातात ३० प्रवासी जखमी झाल्याचे वृत्त आहे. यातील १० जणांना उपचारानंतर घरी पाठवण्यात आले आहे.

धुळे आगारातील चालकाचा अपघातात मृत्यू

अपघातात धुळे आगारातील चालकाचा मृत्यू झाला आहे. मात्र, अद्याप त्यांचे नाव समजू शकलेले नाही. सुरतचे जिल्हाधिकारीही घटनास्थळी पोहोचले असून त्यांनी या घटनेबद्दल दु:ख व्यक्त केला आहे. सध्या मृतांची ओळख पटविण्याचे प्रयत्न सुरू आहेत.

### उस्मानाबाद-लातूर-बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी मिलिंद बोरकर निवडणूक निरीक्षक

**धाराशिव/प्रतिनिधी :** महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांच्या द्विवार्षिक निवडणूक –२०२६ अंतर्गत उस्मानाबाद– लातूर–बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून श्री.मिलिंद बोरकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे.भारत निवडणूक आयोगाच्या १ जून २०२६ पत्रानुसार ही नियुक्ती करण्यात आली आहे. भारत निवडणूक आयोग,नवी दिल्ली यांच्या दि.१८ मे २०२६ रोजीच्या पत्रानुसार महाराष्ट्र विधानपरिषदेच्या स्थानिक प्राधिकारी मतदारसंघांचा निवडणूक कार्यक्रम जाहीर करण्यात आला आहे. त्यानुसार उस्मानाबाद– लातूर–बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघासाठी निवडणूक निरीक्षक म्हणून श्री.मिलिंद बोरकर (भा.प्र.से.) यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदारसंघाशी संबंधित बाबींकरिता त्यांच्याशी मोबाईल क्रमांक ९९३०९९८९६९ वर संपर्क साधता येणार आहे. निवडणूक निरीक्षक श्री.मिलिंद बोरकर यांच्या राहण्याची व्यवस्था धाराशिवजवळील शिंगोली येथील सर्किट हाऊसमध्ये करण्यात आली आहे.

### आपलं मंत्रालय या गृहपत्रिकेच्या अंकाचे सचिव आप्पासो धुळाज यांच्या हस्ते प्रकाशन

**मुंबई/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयातर्फे प्रकाशित होणाऱ्या 'आपलं मंत्रालय' या गृहपत्रिकेच्या मे २०२६ या अंकाचे प्रकाशन इतर मागास बहुजन कल्याण विभागाचे सचिव तथा अतिथी संपादक आप्पासो धुळाज यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी सामान्य प्रशासन विभागाचे अवर सचिव (मावज) अजय भोसले, कक्ष अधिकारी प्रशांत वामन, इतर मागासवर्गीय बहुजन कल्याण विभागाचे सल्लागार कार्तिक पांडे आदी अधिकारी यावेळी उपस्थित होते.

'आपलं मंत्रालय'च्या नव्या अंकामध्ये विकसित महाराष्ट्राच्या वाटचालीतील तंत्रज्ञान, सामाजिक संवेदनशीलता आणि सर्वसमावेशक विकासाचा वेध घेण्यात आला आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता, क्वांटम तंत्रज्ञान, आरोग्य, महिला सक्षमीकरण, सामाजिक न्याय आणि ग्रामीण विकास यांसारख्या विविध विषयांचा समावेश या अंकात करण्यात आला आहे; तसेच सांस्कृतिक, भावनिक आणि मानवी मूल्यांना स्पर्श करणारे लेखही वाचकांसाठी विशेष आकर्षण ठरणारे आहेत.

मंत्रालयातील विविध विभागांतील अधिकारी व कर्मचारी यांच्या कलागुणांना व्यासपीठ मिळावे आणि त्यांना प्रोत्साहन मिळावेख या उद्देशाने गृहपत्रिका प्रकाशनाचा हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

### वसई-विरारकरांसाठी मोठी खुशखबर! मेट्रो १३ मार्गिकेचा नवा आराखडा तयार, प्रवास होणार अधिक वेगवान

**मुंबई/प्रतिनिधी :** मुंबई महानगर प्रदेशातील सार्वजनिक वाहतूक व्यवस्था अधिक सक्षम करण्यासाठी मेट्रो नेटवर्कचा विस्तार वेगाने सुरू आहे. याच पार्श्वभूम ीवर वसई, विरार, नालासोपारा आणि भाईंदर परिसरातील नागरिकांसाठी महत्त्वाची बातमी समोर आली आहे. भाईंदर ते विरार दरम्यान प्रस्तावित असलेल्या मेट्रो १३ मार्गिकेचा सुधारित आराखडा मंजुरीसाठी शासनाकडे पाठवण्यात आला आहे. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून सध्या सुमारे ३३० किलोमीटर लांबीचे मेट्रो नेटवर्क विकसित करण्यात येत आहे. या नेटवर्कमध्ये एकूण १४ मेट्रो मार्गिकांचा समावेश असून काही मार्गिका सुरू झाल्या आहेत, तर काहींचे काम प्रगतीपथावर आहे.

## ठाणे जिल्ह्यात वनपट्टेधारक शेतकऱ्यांसाठी 'AgriStack' अंतर्गत

# फार्मर आयडी नोंदणी मोहिमेला गती

### संचालक अंकुश माने यांच्याकडून कामाचा आढावा

**ठाणे/प्रतिनिधी :** केंद्र व राज्य शासनाच्या विविध कृषीविषयक योजनांचा थेट लाभ (DBT) शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी 'AgriStack' अंतर्गत 'फार्मर आयडी' (शेतकरी ओळखपत्र) तयार करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या अनुषंगाने ठाणे जिल्ह्यातील मुरबाड आणि शहापूर तालुक्यात रविवार, दि.३१ मे २०२६ रोजी वनपट्टेधारक शेतकऱ्यांच्या नोंदणीसाठी विशेष शिबिरांचे (कॅम्प) आयोजन करण्यात आले होते. कृषी आयुक्तालय, पुणे येथील AgriStack चे संचालक श्री. अंकुश माने यांनी या शिबिरांना प्रत्यक्ष भेट देऊन वनपट्टेधारक शेतकऱ्यांच्या समस्या जाणून घेतल्या आणि त्यांना त्वरित फार्मर आयडी नोंदणी करण्याचे आवाहन केले.

'AgriStack' हा शेतकऱ्यांचा एक अद्ययावत डिजिटल डेटाबेस




(माहितीकोश) आहे. यामध्ये शेतकऱ्यांची वैयक्तिक माहिती, जमिनीचा तपशील आणि पिकांची नोंद एकाच ठिकाणी उपलब्ध होणार आहे. कृषी विभागामार्फत राबविल्या जाणाऱ्या सर्व योजनांचा लाभ यापुढील काळात याच फार्मर आयडीद्वारे दिला जाणार आहे. तसेच 'पीएम किसान' योजनेतील पात्र शेतकऱ्यांना हा आयडी प्राप्त केल्याशिवाय योजनेचा पुढील हप्ता दिला जाणार नाही.

यापूर्वी वनपट्टेधारक शेतकऱ्यांची AgriStack अंतर्गत नोंदणी होत नसल्यामुळे, हे शेतकरी महसूल व कृषी विभागाच्या विविध कल्याणकारी योजनांपासून वंचित राहत होते. मात्र, आता 'आदिवासी संशोधन व प्रशिक्षण संस्था' (TRTI), पुणे यांच्या स्तरावरून पडताळणी झालेल्या वनपट्टेधारक शेतकऱ्यांना फार्मर आयडी देण्याची प्रक्रिया गतिमान करण्यात आली आहे.

ठाणे जिल्ह्यातील मुरबाड येथील तहसीलदार कार्यालय, तसेच शहापूर तालुक्यातील दुग व मॉडूळवाडी (dohbmoir) या गावांमध्ये विशेष नोंदणी शिबिरांचे आयोजन करण्यात आले होते. संचालक श्री. अंकुश माने यांनी या ठिकाणी भेट देऊन कामाचा सविस्तर आढावा घेतला. तसेच नोंदणी प्रक्रियेदरम्यान तांत्रिक अडचणींचे व शंकांचे निरसन करून उपस्थित शेतकऱ्यांना मार्गदर्शन केले. या शिबिरांमध्ये जवळपास ८० ते १०० वनपट्टेधारक शेतकऱ्यांनी आपली यशस्वी नोंदणी करून घेतली.

या मोहिमेदरम्यान विभागीय कृषी सहसंचालक (ठाणे) श्री. शिवाजी आमले, अधीक्षक कृषी अधिकारी श्री. बालाजी ताटे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी (ठाणे) श्री. रामेश्र्वर पाचे, उपविभागीय अधिकारी (कल्याण) श्री. आशिष बालगुडे, तालुका कृषी अधिकारी (मुरबाड) श्री. संदीप केणे, तालुका कृषी अधिकारी (शहापूर) श्री. कुमार जाधव उपस्थित होते.

तसेच मंडळ कृषी अधिकारी श्री. भगवान पथारे, टी.आर.टी.आय. समन्वयक श्री. नरेंद्र लाटे व श्री. राकेश पाटील, उपकृषी अधिकारी, संबंधित गावांचे सहाय्यक कृषी अधिकारी, महसूल विभागाचे मुरबाड सजेचे मंडळ अधिकारी, तलाठी आणि सीएससी (CSC) केंद्रांचे प्रतिनिधी यावेळी उपस्थित होते.

## व्ही एस पँथर्स च्या वतीने राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन




**लातूर/प्रतिनिधी :** येथील व्ही एस पँथर्स युवा संघटनेच्या वतीने राजमाता पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त पूर्णाकृती पुतळ्याला जिल्हाध्यक्ष शरद किणीकर यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी संघटनेचे संपर्कप्रमुख आनंद जाधव मार्गदर्शक रवी कुरील विद्यार्थी आघाडी जिल्हाध्यक्ष स्वप्निल कांबळे वाहतूक आघाडी शहराध्यक्ष शाहरुख मणियार समाधान कांबळे समीर सय्यद स्वप्निल कटारे तबरेज पठाण इंजी अतुल किनीकर जिल्हा उपाध्यक्ष आबासाहेब गायकवाड यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

## दयानंद विज्ञानला अकरावीच्या पहिल्या फेरी प्रवेशासाठी विद्यार्थी व पालकांची प्रचंड गर्दी

**लातूर/प्रतिनिधी :** महाराष्ट्र शासनाच्या ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेतील पहिल्या फेरीचे प्रवेश दि. २९ मे २०२६ पासून सुरू झाले असून उद्या दि.०३ जून २०२६ ही शेवटची तारीख आहे.पहिल्या फेरीच्या प्रवेश प्रक्रियेसाठी दयानंद विज्ञान महाविद्यालयात पालक व विद्यार्थ्यांची प्रचंड गर्दी असून विद्यार्थ्यांनी महाविद्यालयामध्ये गुणवत्तेनुसार प्रवेश घेतला आहे. तसेच दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळावा म्हणून प्राधान्य क्रमांक निवडण्यासाठी व इतर माहितीसाठी महाविद्यालयास विनंती केली आहे.

ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप ऑनलाईन पद्धतीमध्ये प्रवेश नोंदणी केलेली नाही, अशा विद्यार्थ्यांनीही दुसऱ्या फेरीत प्रवेश मिळवण्यासाठी महाविद्यालयाकडे संपर्क साधलेला असून प्रवेश समितीद्वारे त्यांना मार्गदर्शन केले जात आहे.ज्या विद्यार्थ्यांचे प्रवेश झालेले आहेत त्या सर्व विद्यार्थ्यांसाठी तात्काळ महाविद्यालयांमध्ये तासिका सुरू करण्याचे नियोजन करण्यात आलेले आहे आणि त्याबाबतीत विद्यार्थ्यांना सूचित करण्यात आलेले आहे.दुसऱ्या यादीत गुणवत्तेनुसार दयानंद



विज्ञान महाविद्यालयात प्रवेश मिळावा यासाठी पालक, विद्यार्थी आग्रही आहेत. त्याचे मुख्य कारण म्हणजे दयानंद विज्ञान महाराष्ट्रातील एक नामवंत कॉलेज असून जेईई ,सीईटी व नीटचा उत्कृष्ट निकाल देणारे एकमेव महाविद्यालय आहे.

## मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत एअर इंडिया इमारत करारनाम्याचे हस्तांतरण

**मुंबई/प्रतिनिधी :** मंत्रालयाजवळील एअर इंडिया इमारत राज्य शासनाने खरेदी केली आहे. एअर इंडिया ॲसेट होल्डिंग कंपनी आणि राज्य शासनाच्या सार्वजनिक बांधकाम विभाग यांच्यातील करारनाम्यांचे हस्तांतरण मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या प्रमुख उपस्थितीत आज करण्यात आले.

बैठकीनंतर मंत्रिमंडळ सभागृहात हा कार्यक्रम पार पडला. उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार, पर्यटन मंत्री शंभूराज देसाई, सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले, मुख्य सचिव राजेश अग्रवाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अप्पर मुख्य सचिव मिलिंद म्हैसकर, मुंबई शहर जिल्हाधिकारी आंचल गोयल, एअर इंडिया कंपनीचे वाणिज्य अधिकारी आदी यावेळी उपस्थित होते.



## मंगल परिणय वधू-वर सूचक केंद्रा चा २५ वा वर्धापन दिवस उत्साहात साजरा

**मुंबई/प्रतिनिधी :** ''विवाह'' प्रत्येकाच्या आयुष्यातला आनंददायी, प्रेरणादायी आणि अविस्मरणीय क्षण. एकप्रकारे आयुष्याला कलाटणी देणारा क्षण. उज्वल भविष्याची नवीन वाटचाल. ही वाटचाल सुकर होण्यासाठी वांद्रे पुर्व मुंबई येथील भिमराज यशवंत शिर्के यांनी १४ एप्रिल २००१ रोजी मंगल परिणय ट्रस्ट अंतर्गत मंगल परिणय वधू-वर सूचक केंद्राची स्थापना केली. प्रत्येक रविवारी सकाळी ११ ते दुपारी ३ वाजेपर्यंत सर्व समाज वधू-वर पालक परिचय सभा घेण्यात येते.

प्रत्येकाकडे विशेष लक्ष देऊन लग्न जुळविण्यासाठी प्रयत्न केले जाते. अशिक्षितां पासून उच्च शिक्षितांचे तसेच विधिवा, विधूर, घटस्फोटीत आणि अपंगांचे ही लग्न जुळविण्यात आले आहेत. हे करत असताना जागेचा प्रश्न खूप भेडसावत होता. प्रत्येक वेळी भाड्याची जागा परवडत नव्हती. परंतु चांगल्या कामातून माघार घेऊ नये म्हणून स्वतः च्या राहत्या घरातून हे कार्य चालू ठेवले. लोकांचा प्रतिसाद खूप मोठया प्रमाणावर मिळत गेला कारण कामाची पद्धत आणि अत्यंत आत्मीयतेने लग्न जुळवण्यासाठी केलेले प्रयत्न आकर्षणा ची बाब ठरली. बघता बघता ह्या कार्याला १४ एप्रिल २०२६ रोजी २५ वर्षे पूर्ण झाली.

आतापर्यंत केलेल्या कार्याचा प्रचार आणि प्रसार संपूर्ण महाराष्ट्रभर व्हावा म्हणून गुरुवार दिनांक २८ मे २०२६ रोजी सायंकाळी ७ वाजता श्री छत्रपती शिवाजी महाराज नाट्य मंदिर दादर येथे २५ वा वर्धापन दिवस अर्थात सुवर्ण महोत्सवी दिन साजरा केला. आणि त्यानिमित्त सर्व समाज वधू-वर मेळावा चे आयोजन ही करण्यात आले. मेळाव्याला विवाहइच्छुक लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

कार्यक्रमाला राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते. काही मान्यवरांची भाषणे झाली. संस्थेतर्फे मान्यवरांना स्मृतिचिन्ह, शॉल आणि छोट्या कुंडीमध्ये तुळशी च्या झाडाचे रोपटे देऊन सन्मान करण्यात आला. सध्या सर्वत्र उष्णता खूप वाढली असून पर्यावरणाचा समतोल राखण्याच्या दृष्टीने नवीन झाडे लावणे खूप गरजेचे आहे. आणि म्हणून आम्ही मान्यवरांना फुलांचा गुच्छा देण्याऐवजी छोट्या कुंडीमध्ये तुळशी च्या झाडाचे रोपटे देऊन सन्मान केला. कार्यक्रमाला आलेल्या सर्वांसाठी महाराष्ट्र बाजार पेठे कडून लकी ड्रॉ च्या माध्यमातून चांदीच्या फोटोफ्रेम, सुटलेन्थ, पैठणी साड्या आणि संस्थेकडून बम्पर ड्रॉ म्हणून सोन्याची नथ अशी विविध बक्षीसे वाटण्यात आली. सर्वांनी कार्यक्रमाचा पुरेपूर आनंद घेतला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन समता शिर्के यांनी केले आणि वधू वर मेळाव्याचे व्यवस्थापन दिक्षा शिर्के-साळवी यांनी के



# श्रीमती प्रयागअक्का कराड आयुर्वेद रुग्णालयातर्फे पंधरा दिवसीय मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिर

## आमदार रमेशअप्पा कराड यांच्या जन्मदिनानिमित्त शिबीराचे आयोजन; रुग्णांना लाभ घेण्याचे आवाहन

**लातूर/प्रतिनिधी :** माईर्स पुणे संचलित लातूर येथील श्रीमती प्रयागक्का कराड आयुर्वेद रुग्णालयाच्या वतीने लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक मा. आ. श्री. रमेशअप्पा कराड यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित करण्यात आलेल्या पंधरा दिवसीय मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिराचे उद्घाटन एमआयटीचे परिसर समन्वयक श्री. पृथ्वीराजदादा कराड यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. या शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.



पंधरा दिवसीय मोफत आयुर्वेदिक आरोग्य शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी एमआयटी मेडिकल कॉलेजचे अधिष्ठता डॉ. एन. पी. जमादार, अकॅडमीक व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, प्रशासकीय अधिकारी मधुकरराव गुटे, तसेच आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. चंद्रकांत चाटे, उपप्राचार्य डॉ. बंडगर सर्व विभागांचे विभागप्रमुख उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी शिबिराच्या अनुषंगाने मौलिक मार्गदर्शन करून जास्तीत जास्त नागरिकांनी या शिबिराचा लाभ घ्यावा असे आवाहन केले. कार्यक्रमास प्राध्यापक, वैद्यकीय अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. उद्घाटनानंतर रुग्ण तपासणीस प्रारंभ करण्यात आला असून शिबिराला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभत आहे.

लातूर येथील एमआयटी परिसरात श्रीमती प्रयागक्का कराड आयुर्वेद रुग्णालय हे शंभर खाटांचे सुसज्ज रुग्णालय असून येथे आयुर्वेदातील एम.डी. व एम.एस. पदवीधारक अनुभवी व तज्ज्ञ डॉक्टरांची सेवा उपलब्ध आहे. मधुमेह, उच्च रक्तदाब, कर्करोग, मणक्यांचे आजार तसेच इतर दीर्घकालीन व दुर्धर आजारांवर आयुर्वेद पद्धतीने उपचार, योग्य जीवनशैलीविषयक सल्ला व मार्गदर्शन दिले जाते.

रुग्णालयात अत्याधुनिक सुविधांनी युक्त फिजिओथेरपी विभाग कार्यरत असून आहार व्यवस्थापन, तणाव व्यवस्थापन, रोगप्रतिबंधक आरोग्य मार्गदर्शन तसेच निरोगी जीवनशैलीबाबत विशेष समुपदेशन केले जाते. तसेच रक्त व लघवी तपासणी, सोनोग्राफी, एक्स-रे, पंचकर्म विभाग आणि विविध आयुर्वेदिक उपचार केले जात असून या शिबिराच्या निमित्ताने रुग्णांसाठी रक्त व लघवी तपासणी, सोनोग्राफी, एक्स-रे तसेच विविध पंचकर्म उपचार, आयुर्वेदिक उपचार प्रक्रिया आणि शस्त्रक्रिया यांवर पन्नास टक्के विशेष सवलत देण्यात येणार आहे. तेव्हा या शिबिराचा जास्तीत जास्त गरजू नागरिकांनी लाभ घ्यावा, असे आवाहन श्रीमती प्रयागक्का कराड आयुर्वेद रुग्णालयाच्या अधिक्षक डॉ. दीप्ती नरहरे यांनी केले.

## चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या प्रवचनमालेचे आयोजन

**लातूर/प्रतिनिधी :** श्रीसद्गुरू सेवा समिती लातूरच्या वतीने ह भ प चैतन्य महाराज देगलूरकर यांच्या तिन दिवसाच्या प्रवर्चनमालेचे आयोजन करण्यात आले आहे.



श्रीसद्गुरू चैतन्य महाराज हे राजा हरिश्चंद्राची कथा सांगणार आहेत. सावेवाडीतील शाम मंगल कार्यालयात ५ जुन ते ७ जुन सांयकाळी सहा या वेळेत कथा होणार आहे. चैतन्य महाराज यांची आयोध्येत ९ दिवसाची श्रीराम कथा यशस्वी झाली आहे. त्या कथेला लातूर जिल्ह्यातुन मोठ्या संख्येने भाविक गेले होते. रामायण, महाभारत, शास्त्र, पुराण यांचा सुरेख संगम आणि त्याची सुसंगत मांडणी करीत चैतन्य महाराज हे विषयाला न्याय देत असतात. अधिक मास आणि दानशुर अशा राजाची कथा ऐकण्याची सुवर्णसंधी लातूरकराना लाभत आहे. त्याचा लाभ सर्वांनी प्रामुख्याने तरुण वर्गाने घ्यावा असे आवाहन दिवाण परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

## राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची ३०१ वी जयंती उत्साहात साजरी

**लातूर/प्रतिनिधी :** राजमाता पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०१ व्या जयंतीनिमित्त राजे मल्हारराव होळकर चौक, झरी रोड, चाकूर येथे राजमाता राष्ट्रमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या प्रतिमेला भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष सुरेश दादा हाके पाटील, नगर पंचायतीचे माजी नगराध्यक्ष मिलिंद महालिंगे माजी नगराध्यक्ष कपिल माकणे यांच्या हस्ते पुष्पहार व पुष्प अर्पण अभिवादन करण्यात आले.

यावेळी या कार्यक्रमाला माजी सरपंच गंगाधर आप्पा केराळे, जयंती महोत्सव-२०२६ चे अध्यक्ष विनायक खंदारे, माजी उपनगराध्यक्ष नितीन रेड्डी, युवा नेते विवेकानंद उजळंबकर, नगरसेवक संजय पाटील, नरसिंग गोलावर, राम कसबे, भाजपा मंडळ अध्यक्ष सिद्धेश्वर पवार,डॉ. भरत हाके साहेब, युवा नेते अश्विन भोसले, पत्रकार सुधाकर हेमनर सर, संदीप महालिंगे, गोविंद चिंचोळे, अशोक शेळके, शुभम जटाळे,ज्ञानेश्वर शेंडगे, दत्ता सुरवशे, युवा नेते बजरंग नरवटे, बालाजी शेंडगे, रोहन सलगर, बाळु कोरे, तानाजी सुरवशे, संगमेश्वर ताडके, उद्योजक किरण जाधव, धोंडगे सोपान, सौदागर चरक, व्यंकट गडदे, सचिन शेळके, विश्वनाथ हाके, पांडुरंग जानकर, सागर सुरणे, मारोती तिवडे, शिवाजी शेंडगे, विजय गोलावर आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या शेवटी संस्थापक अध्यक्ष सुदर्शन येमे यांनी उपस्थितांचे आभार मानले. यावेळी या कार्यक्रमाला पदाधिकारी, कार्यकर्ते व समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते

## सीसीटीव्हीमुळे झाला भांडाफोड; नातेवाईकाची कार पेटविल्याच्या गुन्ह्यात महिलेला अटक

**नागपूर/प्रतिनिधी :** दोन दिवसांपूर्वी नागपूरतील मानकापूर पोलीस ठाण्याचे हद्दीतील गोधणी भागात एका कारला आग लागलेली होती. शॉर्ट सर्किट आणि उष्णतेम ुळे आग लागली असावी, असं प्राथमिकदृष्ट्या वाटत होते. पोलिसांनी या संपूर्ण प्रकरणाचा तपास केला या प्रकरणात धक्कादायक माहिती समोर आली आहे. एका महिलेनं रागाच्या भरात कार पेटवून दिल्याचंही तपासात समोर आलेलं आहे.

निखिलेश राजूरकर यांच्या मालकीची कार आगीत पूर्णपणे जळून राख झाली. त्यांचे दहा लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. याप्रकरणी पोलिसांनी त्या महिलेला अमरावती जिल्ह्यातील दर्यापूर तालुक्यातील जेनपूर येथून अटक केली आहे.



कारच्या आगीचा संपूर्ण प्रकार सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झालाय. त्या आधारे पोलिसांनी आरोपी महिलेला अटक केली आहे. कौटुंबिक वादातून झालेल्या कथित अपमानाचा सूड उगवण्यासाठी नातेवाइकाच्या घराबाहेर उभी असलेली कार महिलेनं पेटवून दिल्याचं समोर आले आहे. अपमानाचा सूड- पुष्पा काशीराम आमले असे अटक करण्यात आलेल्या महिलेचं नाव आहे. ती गोधनी येथील फागोजी ले-आऊटमध्ये राहणाऱ्या बसचालक निखिलेश कृष्णराव राजूरकर यांची नातेवाईक आहे. आर्थिक व्यवहारांवरून दोघांमध्ये वाद सुरू असल्याचं पोलिसांनी सांगितलं. पुष्पा पूर्वी पतीसह गोधनी येथे राहत होती. काही वर्षापूर्वी तिच्या पतीची हत्या झाल्यानंतर ती मूळ गावी परतली. मात्र, नातेवाईकांच्या भेटीसाठी ती नियमितपणे गोधनी येथे येत होती. वारंवार होणाऱ्या वादामुळे निखिलेश आणि त्यांच्या कुटुंबीयांनी तिच्यापासून अंतर ठेवण्यास सुरुवात केली होती.

सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे महिलेला अटक--मानकापूर पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक हरीश काळसेकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासले. त्यातून संशयिताची ओळख पटली. तपासादरम्यान घटनेच्या दिवशी पहाटेच्या सुमारास पुष्पा एका नातेवाइकाच्या घरातून गावाकडे जात असल्याचं सांगून निघून गेल्याची माहिती समोर आली. तसेच तिच्या मोबाईल फोनचं लोकेशनही घटनास्थळ परिसरात आढळले. पुराव्यांच्या आधारे पोलिसांचे पथक दर्यापूर येथे रवाना झाले. पुष्पा आमले हिला अटक करून नागपुरात आणले. या प्रकरणाचा पुढील तपास सुरू असल्याचं मानकापूर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक महेश कळसेकर यांनी सांगितलं.

## म्यानमारच्या अध्यक्षांसह शिष्टमंडळाचे मुंबईत आगमन

**मुंबई/प्रतिनिधी :** म्यानमारचे राष्ट्राध्यक्ष यू मीन आँग ह्लाइंग व त्यांच्या शिष्टमंडळाचे येथील छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळावर आज सकाळी ११.३० वाजता आगमन झाले. राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी पुष्पगुच्छ देऊन त्यांचे स्वागत केले. राजशिष्टाचार मंत्री जयकुमार रावल, म्यानमारचे भारतीय राजदूत अभय ठाकूर, सचिव तथा मुख्य राजशिष्टाचार अधिकारी डॉ. राजेश गवांडे, अतिरिक्त पोलिस आयुक्त मुंबई अभिनव देशमुख, मुंबई उपनगरचे जिल्हाधिकारी सौरभ कटियार, म्यानमारचे महावाणिज्यदूत मोहनराव पिंपळे आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते. त्यानंतर सर्व मान्यवर नियोजित स्थळी रवाना झाले.

## जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगाव बोरी येथे राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभा



**शिरूर अनंतपाळ/प्रतिनिधी :** शिरूर आनंतपाळ तालुक्यातील डोंगरगाव बोरी येथील जिल्हा परिषद शाळेत राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या जयंतीनिमित्त अभिवादन सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष रविकांत नागमोडे यांच्या हस्ते राजमाता अहिल्याबाई होळकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी तंटामुक्ती अध्यक्ष अमोल भिंगोले, शिवराज मोहिते, अमोल काळे, लहू काळे, भारतीय सैन्य दलातील आकाश काळे, शाहरुख मणियार लक्ष्मीबाई जाधव सह आदीजन उपस्थित होते.

## दयानंद फार्मसीच्या विद्यार्थ्यांची थेट विप्रोमध्ये निवड



मयुरी पाटील



क्षितिजा पवार



शुभम भुजबळ

**लातूर/प्रतिनिधी :** फार्मसी क्षेत्रात करियर घडवण्याची संधी मिळावी म्हणून दयानंद शिक्षण संस्था,लातूर द्वारा संचालित दयानंद कॉलेज ऑफ फार्मसी,लातूर येथे बेंगलुरु येथील विप्रो लिमिटेड कंपनी मार्फत कॅम्पस इंटरव्ह्यू आयोजित केले होते.कार्यक्रमाच्या सुरुवातीस मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी केले. मुलाखतीसाठी तज्ज्ञ म्हणून इनक्वीटी टेकनॉलॉजीज चे शार्दूल भोसले उपस्थित होते. त्यांनी विद्यार्थ्यांना विप्रो लिमिटेड कंपनीची कार्यपद्धती, औषध सुरक्षा,फार्माकोविजिलन्स क्षेत्रातील करिअरच्या संधी, तसेच उद्योग क्षेत्रातील अपेक्षित कौशल्यांविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. याशिवाय, मुलाखतीची तयारी, संवाद कौशल्ये आणि व्यावसायिक दृष्टिकोन याबाबतही त्यांनी विद्यार्थ्यांना महत्त्वपूर्ण माहिती दिली.

या कॅम्पस भरती प्रक्रियेत सहभागी विद्यार्थ्यांमधून फार्माकोविजिलन्स असोसिएट या पदासाठी क्षितिजा पवार, साक्षी सूर्यवंशी पाटील, शुभम भुजबळ, मयुरी पाटील आणि अनिकेत उंडरे यांची उत्कृष्ट कामगिरीच्या आधारे निवड करण्यात आली.निवड झालेल्या विद्यार्थ्यांना वार्षिक ₹३.६० लाख ते ₹३.७५ लाख इतके आकर्षक वेतन पॅकेज देण्यात येणार आहे.या यशामुळे महाविद्यालयाच्या प्लेसमेंट परंपरेत आणखी एक मानाचा तुरा खोवला गेला आहे.

या कॅम्पस इंटरव्ह्यूच्या यशस्वीते करिता प्रा.रोहित सारडा व दयानंद शिक्षण संस्थेचे अनिल बिराजदार (टी.पी.ओ.) यांनी सूत्रबद्ध नियोजन करत परिश्रम घेतले. अशा या उपयुक्त उपक्रमाबद्दल दयानंद शिक्षण संस्थेचे अध्यक्ष लक्ष्मीरमणजी लाहोटी, सचिव रमेशजी बियाणी, सहसचिव विशालजी लाहोटी, सहाय्यक सचिव अजिंक्यजी सोनवणे, कोषाध्यक्ष संजयजी बोरा, आणि महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ.क्रांती सातपुते यांनी निवड झालेल्या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले आहे.

## लातूर जिल्ह्यातील ४१४ ग्रामपंचयतींच्या सदस्य आरक्षण सोडतीचा कार्यक्रम जाहीर

**लातूर/प्रतिनिधी :** राज्य निवडणूक आयोगाच्या २६ मे, २०२६ च्या आदेशन्वये सन २०२४ व २०२५ मध्ये मुदत संपलेल्या तसेच सन २०२६ या कालावधीत मुदत संपणाऱ्या व नवनिर्मित ग्रामपंचायतीच्या सार्वत्रिक निवडणुकीसाठी सदस्यांच्या आरक्षण सोडतीचा कार्यक्रम घोषित केला आहे. यामध्ये लातूर जिल्ह्यातील लातूर, रेणापूर, चाकूर, अहमदपूर, जळकोट, उदगीर, देवणी, शिरुर अनंतपाळ, निलंगा, औसा या तालुक्यातील एकूण ४१४ ग्रामपंचायतींचा समावेश आहे.



या आरक्षण सोडत कार्यक्रमानुसार सोमवार, ८ जून, २०२६ रोजी विशेष ग्रामसभेची सूचना देण्यात येईल. शुक्रवार, १२ जून, २०२६ रोजी विशेष ग्रामसभा बोलावून, तहसीलदार यांनी प्राधिकृत केलेल्या अधिकाऱ्यांच्या अध्यक्षतेखाली, आरक्षणाची सोडत काढण्यात येईल. यामध्ये अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग, अनुसूचित जाती महिला, अनुसूचित जमाती महिला, नागरिकांचा मागासवर्ग प्रवर्ग महिला व सर्वसाधारण महिला आरक्षण निश्चित होईल. बुधवार, १७ जून ,२०२६ रोजी प्रभागनिहाय आरक्षण प्रारुप अधिसूचनेला जिल्हाधिकारी यांनी मान्यता देतील. शुक्रवार, १९ जून, २०२६ रोजी प्रभागनिहाय आरक्षणाचे प्रारुप प्रसिध्द केले जाईल. दि. १९ ते २५ जून, २०२६ या कालावधीत प्रभागनिहाय आरक्षण निश्चितीबाबत हरकती व सूचना दाखल करता येईल.

शुकवार, ३ जुलै, २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी प्राप्त हरकती विचारात घेवून अभिप्राय देणे, बुधवार, ८ जुलै, २०२६ रोजी उपविभागीय अधिकारी यांचे अभिप्राय विचारात घेवून अंतिम अधिसूचनेस (नमुना अ) जिल्हाधिकारी यांनी मान्यता देण्याची कार्यवाही केली जाईल. १० जुलै, २०२६ रोजी जिल्हाधिकारी यांनी मान्य केलेल्या अंतिम प्रभाग रचनेला (नमुना अ) व्यापक प्रसिध्दी देण्यात येईल, असे लातूर जिल्हाधिकारी कार्यालयातील उपजिल्हाधिकारी (सामान्य प्रशासन) सायली ठाकूर यांनी कळविले आहे.

## ३३ वर्षांच्या प्रदीर्घ सेवेनंतर मुख्याध्यापक राऊत सरांचा सेवापूर्ती गौरव सोहळा उत्साहात

**लातूर/प्रतिनिधी :** १ जून २०२६ रोजी संस्थेच्या वतीने कमला नेहरू माध्यमिक विद्यालय, लातूरचे मुख्याध्यापक श्री. राऊत सर यांच्या सेवापूर्ती निमित्त भव्य गौरव सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. तब्बल ३३ वर्षे शिक्षण क्षेत्रात प्रामाणिकपणे, निष्ठेने व विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी योगदान दिल्याबद्दल राऊत सरांचा त्यांच्या सुविद्य पत्नीसह मान्यवरांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.



कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेच्या अध्यक्षा सय्यद यास्मिन मॅडम या होत्या. संस्थेचे सचिव अजिज सय्यद सर यांच्या हस्ते शाल, श्रीफळ, पुष्पहार व स्मृतिचिन्ह देऊन राऊत सरांचा गौरव करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी राऊत सर यांच्या कार्याचा गौरव करताना त्यांच्या शैक्षणिक, सामाजिक व प्रशासकीय कार्याचा विशेष उल्लेख केला. विद्यार्थ्यांप्रती असलेली आत्मीयता, शिक्षकांमधील समन्वयाची भूमिका आणि संस्थेच्या प्रगतीसाठी त्यांनी केलेले योगदान याबद्दल अनेकांनी भावना व्यक्त केल्या. तसेच त्यांच्या भावी आयुष्यासाठी उत्तम आरोग्य व सुखसमृद्धीच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

याप्रसंगी संस्थेचे सदस्य तथा मुख्याध्यापक (सय्यद अंकुलगा) अश्फाक सय्यद सर, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी सय्यद सर, प्राथमिक विभागाच्या मुख्याध्यापिका श्रीमती नुसरत देशमुख मॅडम, पर्यवेक्षक सिद्दिकी अन्वर सर, मुजफर सर, कुलकर्णी सर, राजमाने सर, लिंबोरे सर, वाघमारे सर, पठाण सर, शेखनूर सर, कचबावार सर, जाहेद सर, पठाण वाय. ए. सर, जावेद सर, चादर सर, घोडके सर, गायकवाड सर, कापुरे सर, राहुल गायकवाड सर, शेख खालेद सर, इंजिनियर गायकवाड सर, लामतुरे सर, प्रकाश जोशी सर, रवी महापुरे, ओमकार भिसे, मुळे मॅडम, शेख मॅडम, पठाण मॅडम, रपकाळ मॅडम, लक्ष्मीबाई सूर्यवंशी यांच्यासह सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, राऊत सरांच्या आई, भाऊ संजय राऊतसह मित्रमंडळी तसेच नातेवाईक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक अनिल कुलकर्णी सर यांनी केले. सूत्रसंचालन श्रीमती अनुराधा कुलकर्णी मॅडम यांनी प्रभावीपणे केले, तर आभार प्रदर्शन सिद्दिकी अन्वर सर यांनी मानले. संपूर्ण कार्यक्रम अत्यंत उत्साहपूर्ण आणि भावनिक वातावरणात पार पडला.

हे पत्रक मालक, प्रकाशक, संपादक अशोक नामदेवराव हनवते यांचे करीता मुद्रक घोणे नरसिंह पांडूरंग यांनी मॅजिक पब्लीकेशन, शॉप नं. १०, मनपा शॉर्पींग कॉम्प्लेक्स, गांधी चौक, लातूर - ४१३५१२ येथे छापून कार्यालय द्रोपत माय निवास, खडक हनुमान मंदिर, मिलिंद नगर, लातूर ता. जि. लातूर ४१३५१२ येथे प्रकाशित केले.